केंद्र पुरस्कृत योजना सन २०१७-१८

“वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रम” योजनांतर्गत राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याकरीता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०९.१७/प्र.क्र.२३८/फ-१

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक :- २१ मार्च, २०१८.

वाचा :-

१. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दिनांक :- १८.०४.२०१७.
२. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक :- ३०.०६.२०१७.
३. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक एफ. नंबर-१३-१३/२०१७, डब्ल्यूएल, दिनांक ०४.०९.२०१७.
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय डब्ल्यूएलपी-०९.१७/प्र.क्र.२३८/फ-१, दिनांक ०७.१०.२०१७
५. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८
६. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक एफ. नंबर-१३-१३/२०१७, डब्ल्यूएल, दिनांक २७.०२.२०१८
७. अपर प्रधानमुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्रराज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष-१/सी/यो/प्र.क्र.१५/२३४३/१७-१८ दिनांक १४.०३.२०१८

प्रस्तावना :-

वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रम (Integrated Development of Wildlife Habitats) ह्या योजनांतर्गत पूर्वी केंद्र शासनाकडून अनावर्ती बाबींकरीता २४०६ ०७८४ या लेखाशिर्षातंर्गत ५०% केंद्र अनुदान उपलब्ध करुन दिले जात होते. तथापि सन २०१६-१७ मध्ये सदर योजनेच्या हिस्सा पध्दतीमध्ये बदल करण्यात आल्याचे केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रायल, नवी दिल्ली यांनी सूचविले. त्या नुसार सन २०१७-१८ मध्ये व्याघ्र प्रकल्प वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रम (Integrated Development of Wildlife Habitats) ह्या या योजनेकरीता केंद्र हिस्सा ६०% अंतर्गत २४०६ ०७८४ हे लेखाशिर्ष तर त्याच अनुरुप राज्य हिस्सा ४०% अंतर्गत २४०६ २३८४ या लेखाशिर्षाचा वापर करण्यात येत आहे.

२. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत योजना- “वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रमा” अंतर्गत राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याचे विकासाकरिता केंद्र शासनाने संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये रु. ११८३.७४ लक्षच्या कार्यबाबींस केंद्र शासनाने मंजूरी प्रदान केलेली आहे. संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये प्रथम हप्ता रु. ९४६.९९२ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

३. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत योजना- “वन्यजीव अधिवासाचे एकात्मिक विकास कार्यक्रमा” अंतर्गत राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याचे विकासाकरिता केंद्र शासनाने दुसरा हप्ता रु. १४२.०४९ लक्ष निधी संदर्भिय क्रमांक ६ अन्वये वितरित केला आहे.

<u>शासन निर्णय</u>

१. सबब आता सदर शासन निर्णयान्वये रु. **२३६.७४८** लक्ष संदर्भ क्रमांक ५ च्या पत्रान्वये केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या कार्यबाबींवर खर्च करण्यास खालील अटीवर शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे

२. प्रस्तावित खर्चापैकी **I)** अनावर्ती व आवर्ती सर्वसाधारण घटक कार्यबाबींसाठी रु. **१४२.०४९** लक्ष ६० % केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत विकासात्मक कामांसाठीचा खर्च लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवनाचे संवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, केंद्र पुरस्कृत योजना (००)(०३) वन्यजीवन व्यवस्थापन आणि संरक्षण (५० % केंद्रीय अनुदान) (२४०६ ०७८४) **II)** त्या अनुरुप राज्य शासनाचा राज्य हिस्सा ४० % करीता रु. **९४.६९९** लक्ष लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, (००)(१६) वन्यजीवन व्यवस्थापन आणि संरक्षण (५० % राज्य हिस्सा) (२४०६ २३८४) च्या सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून खर्च करण्यात यावा.

I. सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने संदर्भीय पत्रान्वये मान्यता दिलेल्या तपशीलाच्या कार्यबाबींवर खर्च करण्यात यावा. सदर कामांना सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असल्याखेरीज रक्कम खर्ची टाकण्यात येऊ नये.

II. वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच केंद्र शासनाने प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

III. प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.

IV. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दिनांक :- १८.०४.२०१७ व क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक :- ३०.०६.२०१७ व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

V. प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनाचा हिस्सा व राज्य शासनाचा हिस्सा मधील अंतर्भूत १० % Flexi Fund बाबत केद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक :- १८.०४.२०१७, क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७, व क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११७४४३४०११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.03.21 17:47:23 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर.
६. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयतस) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).